कार्या. क्र. ①

महाराष्ट्र शासन

शाशिवि-१०९१/के. नं. ५०/क्रियुसे-३
समाजकल्याण सांस्कृतिक कार्य,
क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय विस्तार
मुंबई ४०० ०३२.

दिनांक २८ ऑगस्ट, १९९१.

प्रति,

कुलसचिव,
अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

विषय:- सन १९९१-९२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शारीरीक शिक्षण महाविद्यालयांना परवानगी देणेबाबत.

महोदय,

अमरावती विद्यापीठ अधिनियम १९८३ च्या कलम ५१[४] [सी][एक] अन्वये

१९९१-९२ या शैक्षणिक वर्षापासून नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरिता शासनाकडे प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करुन श्री. हनुमान व्यायाम शाळा क्रिडा मंडळ, यवतमाळ या संस्थेस सन १९९१-९२ पासून यवतमाळ येथे नवीन शारिरीक शिक्षण महाविद्यालय सुरु करण्याकरिता व सदर अधिनियमाच्या कलम ५१[५] च्या अनुषंगाने विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या अर्जावर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याची विद्यापीठास परवानगी देण्याचे शासनाने ठरविले आहे.

२. सदर शारिरीक शिक्षण महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येत असून अमरावती विद्यापीठ तसेच संचालक [क्रिडा व युवक सेवा] यांनी विद्यार्थी संख्येबाबत घातलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे सदर महाविद्यालयावर बंधनकारक राहील.

३. अमरावती विद्यापीठ अधिनियम १९८३ च्या कलम ५१ [६] अन्वये अंतिम संलग्नीकरणाचा प्रस्ताव विद्यापीठाकडून प्राप्त झाल्यावर विद्यापीठ अधिनियमाच्या कलम ५१[७] अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार अंतिम मंजूरीचा शासन निर्णय निर्गमित करण्यात येईल.

आपला विश्वासू,
(अ.पां. शहाणे)

[अ. पां. शहाणे]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:
सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
चेअरमन, हनुमान व्यायाम शाळा क्रिडा मंडळ, यवतमाळ
निवड नस्ती, का. क्रियुसे-३